

# श्री संत ज्ञानेश्वर अभंगवाणी-कांट्याच्या अणिवर वसलि

https://www.chalisa.online

कांट्याच्या अणिवर वसलि तिन गांव ।
दोन ओसाड, एक वसेचि ना ॥१॥

वसेचि ना तेथें आले तीन कुंभार ।
दोन थोटे, एका घडीच ना ॥२॥

घडीच ना त्यानें घडलीं तीन मडकीं ।
दोन कच्चीं, एक भाजेचि ना ॥३॥

भाजेचि ना त्यांत रांधले तीन मूग ।
दोन हिरवे, एक शिजेचि ना ॥४॥

शिजेचि ना तेथें आले तीन पाहुणे ।
दोन रुसले, एक जेवीच ना ॥५॥

जेवीच ना त्याला दिल्ह्या तीन म्हशी ।
दोन वांझ्या, एक फळेचि ना ॥६॥

फळेचि ना तिला झाले तीन टोणगे ।
दोन मेले, एक जगेचि ना ॥७॥

जगेचि ना त्याचे आले तीन रुपये ।
दोन खोटे, एक चालेचि ना ॥८॥

चालेचि ना तेथें आले तीन पारखी ।
दोन आंधळे, एका दिसेचि ना ॥९॥

दिसेचि ना त्याला दिल्या तीन बुक्क्या ।
दोन हुकल्या, एक लागेचि ना ॥१०॥

ज्ञानदेव म्हणे याचा तो अनुभव ।
सद्‍गुरूवांचोनि कळेचि ना ॥११॥

|| https://www.chalisa.online ||